# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. ८२१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/१२/२०१७

**१) एटीएम गॅस कटरने कापुण रक्कम चोरुन नेण्याचा प्रयत्न केल्याने व शस्त्राचा धाक दाखवुन जिवो कंपनीचा मोबाईल चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील एका पांढऱ्या रंगाची महीन्द्रा एसयुव्ही चार चाकी वाहना मधुन आलेल्या ५ अनोळखी आरोपीतांनी चांदनी चौकातील एसबीआय बॅकेचे एटीएम गॅस कटरने कापुण त्यातील रक्कम चोरुन नेण्याचा प्रयत्न करीत असतांना घटनास्थळा समोर फिर्यादीला ऊभा पाहुन त्यास अग्नी शस्त्राचा धाक दाखवुन जिवो कंपनीचा मोबाईल किंमती ५,०००/–रु. चा जबरीने हिसकावुन नेवुन त्यास अन्यायाने बसवुन पकडुन घेवुन जाण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी असीम ईस्साईल शेख वय १७ वर्ष, रा. विवेकानंद नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट नुसार पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३९५,३९८,३४२,३६४ भादवी, सहकलम ३/२५ भा. ह. का सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन महिलेची ठगबाकी करुन सोन्याचे दागीने चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१२/२०१७ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती मंगला भोजराम पाटील वय ६५ वर्ष, रा. इंदीरा नगर तुमसर ही मार्निक वॉक करुन घरी परत येत असतांनी ३ अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी जवळ जावुन आम्ही पोलीस आहोत? अशी बतावनी करुन येवळा सोना घालुन कशाला जाता? तुमच्या सुरक्षे साठी आम्हाला सकाळ पासुन डिवटीवर यावे लागते तुम्ही आमचे कडे दागीने दया कागदा मध्ये बांधुन देतो असे म्हणुन संगनमत करुन फिर्यादी कडुन १ सोन्याची चैन १२ ग्रॅम, किंमती २५,०००/–रु. व १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, किंमती १०,०००/–रु. असा एकुण ३५,०००/–रु. चे दागीने कागदाच्या पुडीत बांधुन दिली अशी ठगबाजी करुन दागीने घेवुन गेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४१९,४२०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) बिना नंबरचा ट्रॅक्टरने मोटार सायकलला कट मारल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१२/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ व्ही ५२१८ ला मागेहुन येवुन कट मारली व भरधाव वेगाने पडुन जात असतांनी फिर्यादीने ट्रॅक्टरला ओव्हरटेक करुन थांबवील असता ट्रॅक्टरला मागे व पुढे नंबर प्लेट नव्हती सदरची माहीती पोलीसांना देवुन पोलीसासह ट्रॅक्टर पोलीस स्टेशन ला घेवुन आल्याने फिर्यादी आकाश जयकिशन बोंन्द्रे वय २० वर्ष, रा. आंधळगाव यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९ भादवी. सहकलम ५०(१)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाभरे स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) वाहतुक परवाना नसतांना प्राणी निदर्यतेने भरुन नेतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९/१२/२०१७ चे ०१.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी त्याचे ताब्यातील ट्रक मध्ये ३ म्हशी व १५ हेले किंमती १,८०,०००/–रु. चे भरुन त्यांना नेत असतांना कुठल्याही प्रकारचा जनावरे वाहतुक परवाना नसतांनी ट्रक चा आरोपी चालक मिळुन आल्याने व पोलीसांचा ईशारा भंग करुन पळुन गेल्याने त्यास पकडुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. गुलाब भोंदे यांचे रिपोर्ट व वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ११(१)(ड)(ई)प्रा. नि. वा. प्र. का. सहकलम ११९ मपोक सहकलम १८४, १३२,८३,६६/१९२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गभणे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) शाळेतील सार्वजनीक पाण्याचे टाकीत फॉलीक ॲसीडच्या गोडया टाकुन विद्यार्थ्यांना अपाय होईल व पाणी दुषीत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/१२/२०१७ चे ११.३० ते १८/१२/२०१७ चे १०.१५ वाजता दरम्यान यातील संशयीत आरोपीने फॉलीक ॲसीडच्या गोडया शाळेतील सार्वजनीक पाण्याचे टाकीत टाकुन विद्यार्थ्यांना अपायकारक होईल या उद्येशाने पाणी दुषीत केल्याने फिर्यादी बुधा चिंधुजी बागडे वय ५७ वर्ष, रा. मोहाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) टिप्पर चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु . :—**

दिनांक १९/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मनोज भास्कर पडोळे वय ३१ वर्ष, रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड भंडारा हा व त्याचा मित्र त्याचे मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ पी ०३७१ ने भंडारा वरुन तुमसर कडे जात असतांना बोथली गावाजवळ यातील पिवळया रंगाच्या आरोपी टिप्पर चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादचे मोटार सायकला मागेहुन बोथली माहुली रेस्टॉरेंट जवळ येथे धडक मारुन फिर्यादीला जखमी करुन मोटार सायकलला चालक— तुलसी सिताराम नेवारे वय २९ वर्ष, रा. रानी लक्ष्मीबाई वार्ड भंडारा याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवी. सहकलम १८४,१३२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि कारंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**७) टाटा इंडीका चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोघांचा मृत्यु . :—**

दिनांक १८/१२/२०१७ चे २२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक रोहीत आनंदराव राऊत वय अंदाजे २६ वर्ष, रा. धारगाव याने त्याचे ताब्यातील टाटा इंडीका कार ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन एनएच ६ रोडवरील भंडारा कडे येणाऱ्या चौपद्री रस्त्याचे मधातील डिव्हायडवर गाडी चढवुन लोखंडी दिशा दर्शक फलकाला धडक दिल्याने गाडी पलटी होवुन बसलेला गुनवंत डोलीराम टेंभेकर वय ३७ वर्ष, रा. धारगाव याचे मरणास व स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी डोलीराम लक्ष्मण टेंभेकर वय ७२ वर्ष, रा. धारगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) चारचाकी वाहनांच्या धडकेत तीन जखमी . :—**

दिनांक १९/१२/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील ट्रक क्र. सीजी ०४ जेसी ७३९९ हा नागपुर कडुन भंडारा कडे एनएच ६ रोड ने जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन ट्रक ला एनएच ६ रोड पेट्रोल पंप येथे मागेहुन धडक मारुन स्वतः व गाडीत बसलेले मनोज वंजारी पुनम वंजारी, निखील चोपकर, तारसाबाई वंजारी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुरेश रामायन चौधरी वय ४५ वर्ष, रा. बडकाअगटा ता. निगज जि. गोपालगंज बिहार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सोडगीर पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**९) संगनमत करुन बुक्यांनी मारपीट व लांबाझोबी करुन खाली पाडल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १९/१२/२०१७ चे १२.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी रामभाऊ अभिमन सोनडवले वय ६० वर्ष, रा. भंडाळा याचा जखमी मुलगा धनराज सोनडवले वय ३१ वर्ष, याने मुलगी कु सुप्रीया हिला गवत आनण्याकरीता शेतावर जायचे आहे मला आंघोळी करीता पाणी टाक? असे बोलुन बडबड करीत असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ व २ हे फिर्यादीचे मुलाजवळ येवुन तु कोणाला शिवीगाळ करतोस? असे बोलुन दोन्ही आरोपींनी फिर्यादीचे मुलास बुक्यांनी मारपीट करुन व लांबाझोबी करुन शेजाऱ्यांचे संडासजवळ पाडल्याने खाली पडुन फिर्यादीच्या मुलाच्या कपाळावर, डोक्यावर मार लागल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

१०) डोक्याला मार लागुन महिलेचा मृत्यु . :–

दिनांक १९/१२/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सुनंदा सुनिल मेघरे वय ४५ वर्ष, रा. बाम्हणी ही आटा चक्कीवर दळण्या करीता गेली असता चालु आटा चक्कीच्या पट्यामध्ये साडी पडुन खिचल्या गेल्याने तीचे डोक्याला मार लागुन जखमी होवुन मरण पावल्याने फिर्यादी सुनिल ईश्वर मेघरे वय ४९ वर्ष, रा. बाम्हणी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

११) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १९/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन लाखनी, लाखांदुर व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४ लिटर हातभट्टी दारू किंमती ४००/–रु. व २ लिटर ७०० मिली देशी दारु किंमती ९००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १८५/–रु. असा एकुण १,४८५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १९/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ११ केसेस व ईतर वाहनांवरती –७५ केसेस करण्यात आलेले आहे.

(एच.एम. रायपुरे)
स.पो.नि. (नियत्रंण कक्ष अधीकारी)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९७०७३२०७९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.